दूरध्वनी 020-66262629
ई-मेल : resettle.dsw@mahasainik.com

सैनिक कल्याण विभाग,
महाराष्ट्र राज्य, रायगड इमारत
राष्ट्रीय युध्द स्मारकासमोर
घोरपडी, पुणे- 411 001

क्रमांक : 18164/शै.स/सैकवि-17

दिनांक : २ फेब्रुवारी २०१७

मा. कुलगुरु
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठ नागपुर
(महाराष्ट्र राज्य सर्व विद्यापीठ )

विषय : <u>शैक्षणिक अभ्यासक्रमासाठी आजी-माजी सैनिकांच्या पाल्यांसाठी जागा राखीव ठेवणेबाबत.</u>

संदर्भ : १. महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र. माजीसै-२००६/(२४१/०६)/मशि-६ दिनांक १० सप्टेंबर २००७.
२. पुणे विदयापीठ पत्र क्रमांक आरक्षण/ओ-५१/१०३४ दिनांक १६ जूलै २०१४.
३. महाराष्ट्र शासन क्र. संकिर्ण-१०१४/प्र.क्र.१३६/मशि-२ दिनांक २१ जूलै २०१४.

2. उपरोक्त विषयी संदर्भीय शासन परिपत्रक व शासन निर्णयातील तरतूदीनूसार विविध शैक्षणिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी राज्यातील आजी-माजी सैनिकांच्या पाल्यांना जागा आरक्षीत ठेवण्यात आल्या आहेत.

३. त्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपल्या विद्यापीठाच्या अधीपत्याखालील सर्व महाविद्यालयांमध्ये ( अभियांत्रिकी महाविद्यालये, टेक्नीकल, टेक्नॉलॉजीकल, पॉलीटेक्नीक, कला, वाणिज्य् व अध्यापक महाविद्यालये) सर्व अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये आजी-माजी सैनिकांच्या पाल्यांना आरक्षणाचा लाभ देण्यात यावा.

४. तसेच संदर्भीय शासन निर्णयातील तरतुदीनूसार शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ पासून चालू होणा-या शैक्षणिक वर्षापासून माजी सैनिकांच्या पाल्यांना राखीव ठेवण्यात आलेल्या जागेवर प्रवेश देते वेळी माजी सैनिकांच्या पाल्याकडे संबंधीत **जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाकडून देण्यात आलेले "माजी सैनिक पाल्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र "** आसल्याशिवाय प्रवेश देण्यात येऊ नये. तसेच सादर केलेल्या प्रमाणपत्राबाबत कांही शंका उपस्थित झाल्यास प्रमाणपत्राच्या सत्यतेबाबतची खातर जमा संबंधीत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाकडून करुण घेण्यात यावी.

५. उपरोक्त विषयी आपल्या स्तरावरुन आदेश निर्गमीत करणे बाबत आपणास विनंती करण्यात येत आहे. (अधिक माहितीसाठी पुणे विद्यापीठाने केलेल्या कार्यवाहीचे पत्र सोबत जोडले आहे.)

D.R. (Acad.) / (College)
पुढील आवश्यक कार्यवाहीस्तव
२/८/१७
कुलसचिव

(बिपीन द. शिंदे)
कर्नल (निवृत्त)
उपसंचालक (पुनर्वसन)
संचालकाकरीता

सोबत : वरील प्रमाणे

आवक क्रमांक 1363
जावक क्रमांक 1365 दिनांक 8/02/17